मंगळवार, दि. २० मे २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २८५ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवात सनातन धर्माचा ध्वज फडकला



**फोंडा, गोवा (सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवलेनगरी)** - सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाच्या दुसर्या दिवशी ऐतिहासिक घटना घडली. या वेळी सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांच्या शुभहस्ते सनातन धर्माच्या ध्वजाचे आरोहण शंखनाद आणि वेदमंत्रांच्या गजरात करण्यात आले. या वेळी सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी श्रीसत्शक्ति (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ आणि श्रीचित्शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ यांच्यासह सनातनच्या संतांची वंदनीय उपस्थिती लाभली. या वेळी कार्यक्रमाला २३ देशांतील २० हजारांहून अधिक साधक आणि हिंदू धर्मप्रेमी उपस्थित होते. या वेळी 'सनातन हिंदु धर्माचा विजय असो', 'जय श्रीराम'च्या घोषणांनी आसमंत दुमदुमले. 'सनातन धर्माचा ध्वजा'चे वैशिष्ट्य : प्रत्येक मंदिरात जशी ध्वजस्थापना होते, तसे सनातन राष्ट्राशी संबंधित 'सनातन धर्मध्वजा'चे आरोहण करण्यात आले. हा ध्वज राजकीय किंवा संविधानिक नसून आध्यात्मिक स्वरूपाचा आहे. हा 'धर्मध्वज' आहे. 'सनातन हिंदु राष्ट्राची स्थापना' या ध्येयाची विश्वाच्या कानाकोपर्यात असलेल्या हिंदूंना हा ध्वज जाणीव करून देईल. महाभारताच्या युद्धात श्रीकृष्ण आणि अर्जुन ज्या रथावर आरुढ झाले होते, त्या रथावर बसून हनुमंताने जो ध्वज हातात धरला होता, तो सनातन धर्माचा ध्वज होता. हनुमंताचा रंग शेंदरी म्हणजे केशरी आहे; म्हणून सनातन राष्ट्राचा ध्वज केशरी रंगाचा आहे. या ध्वजावर 'कल्पवृक्षाच्या खाली कामधेनु उभी आहे', असे चित्र आहे. कल्पवृक्ष आणि कामधेनु ही दोन्ही 'समृद्धी, पालन-पोषण, संरक्षण अन् श्रीविष्णूचा अभय वरदहस्त' यांची प्रतिके आहेत.

'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव'

## उद्योजक घनश्याम गोयल यांचा सहभाग



**जालना । प्रतिनिधी** - मानवजातीच्या परम कल्याणासाठी, तसेच रामराज्याच्या स्थापनेसाठी कार्यरत सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांचा ८३ वा जन्मोत्सव आणि सनातन संस्थेचे रौप्य महोत्सवी वर्ष या निमित्ताने फोंडा-गोवा येथे 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवात १९ मे या दिवशी विश्वकल्याणासाठी, तसेच लोकांचे आरोग्य चांगले रहाण्यासाठी 'महाधन्वंतरी यज्ञ' पार पडला.

या 'महाधन्वंतरी यज्ञा'त उद्योजक घनश्याम गोयल यांनी सहभाग घेतला. यज्ञासाठी येथील उद्योजक श्री घनश्याम गोयल हे सपत्नी उपस्थित होते.

## भगवान धनगे यांना मानाचा महाराष्ट्र रत्न समाजभूषण पुरस्कार जाहीर

**टेंभूर्णी । प्रतिनिधी** - ए. डी. फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य, तर्फे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर राज्यस्तरीय महाराष्ट्ररत्न गौरव पुरस्कार सोहळा २०२५ ,पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे, या सन्मान सोहळ्यासाठी महाराष्ट्ररत्न समाजभूषण पुरस्कार साठी भगवान धनगे यांची निवड करण्यात आली आहे. अविस्मरणीय भव्य पुरस्कार वितरण सोहळा पुणे येथे संपन्न होणार आहे. या सोहळ्यासाठी मा. मंत्री, लोकप्रतिनिधी, कलावंत, अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते इ. उपस्थित राहणार आहेत. सन्माननिय अतिथींच्या हस्ते भगवान धनगे यांना या पुरस्काराचे वितरण होणार आहे. हा पुरस्कार त्यांना उल्लेखनीय कार्याचा गौरव म्हणून जाहीर झाला आहे. निवड पत्रात ए. बी फाउंडेशन ने असे म्हटले आहे की,तुम्ही जे पवित्र विधायक कार्य आपण हाती घेतले आहे ते तुमच्या हातून निरंतर घडत राहो,आपण करत असलेल्या उल्लेखनीय, प्रभावी कार्यातून एक सक्षम राष्ट्राच्या प्रस्थापनेचा प्रवाह भक्कम होऊन सखोल मानवीय अंतर्मनाचा चेहरा प्रफुल्लित सन्मुख होतो. तुम्ही कार्यरत असलेल्या क्षेत्रात तुम्ही तुमच्या कार्याचा ठसा उमटवला आहेच शिवाय आपल्या हातून होत असलेली राष्ट्रसेवा ही खरोखरंच अभिमानाची व कौतुकास्पद बाब आहे कष्टाची जाणीव व सत्याची कास धरुन चालतांना आपल्याकडं पाहिलं की आपण कार्यरत असलेल्या क्षेत्रामध्ये नव्याने येऊ पाहणाऱ्या युवकांना नक्कीच प्रेरणा मिळते. एक अष्टपैलू व्यक्तीमत्वं कसं असावं याचं उत्तम उदाहरण आपल्याकडं पाहिलं की लक्षात येतं. आपण सदैव आनंदी रहावे व इतरांना आनंदी करावे ही मनस्वी इच्छा! असे पुढे निवड पत्रात म्हटले आहे.



या निवडीबद्दल काजळा गावातील प्रतिष्ठित नागरिक,मित्र परिवार,नातेवाईक यांच्याकडून भगवान धनगे यांच्यावर अभिनंदन व शुभेच्छाचा वर्षाव होत आहे तसेंच त्यांना पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहे.

### युवा आदर्श
### एकत्र ...

दोन जुन्या गटांनी
पुन्हा यावे रे एकत्र
विसरु जावे शत्रुत्व
बनायचे घनिष्ठ मित्र
एक पडता ठिणगी
चर्चा उडाली सर्वत्र
मिडिया हवे निमीत्त
तेल सांडले यत्रतत्र
कट्टर दुश्मन बनले
बदले कसे सन्मित्र
विचार ना स्नेहाचा
तोडताना गंठा सूत्र
एकशेपाच दुभंगता
रे शहारले गात्र गात्र
लढाया सुसज्ज कसे
गुरूवर्य आणि छात्र
राजकारणी काहीही
बदलत राहती चित्र
अंदाज सगळे चुकवे
अतिविचीत्र कुरुक्षेत्र
होईलं ते ते पहायचे
विस्पारु नकात नेत्र
मतदाना पुरते फक्त
आपले जाणावे क्षेत्र
जुळविता परिवारा
हेतू असावा पवित्र
शंका हव्या कशाला
निर्लोभ दिसो चरित्र

हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

## नागरिकांच्या घरात नाल्याचे पाणी!

### पावसाळ्यापुर्वी नाले सफाई करा अन्यथा पालिकेसमोर तीव्र आंदोलन छेडण्याचा पाडेवार यांचा इशारा

**परतूर । प्रतिनिधी** - मान्सूनपूर्व पावसाने नगरपालिकेचा नाकर्तेपणा दाखवून दिला.पावसाळा तोंडावर आला असताना नगरपालिकेने अद्यापही मान्सूनपूर्व नालेसफाईची कामे हाती घेतली नाहीत. परिणामी शनिवारी सायंकाळी झालेल्या जोरदार पावसात गाव विभागातील छोटे पंजेतन तसेच कायमखानी गल्लीतून वाहणाऱ्या नाला तुंबला.पाणी थेट नागरिकांच्या घरात शिरले.रस्त्यावर गुडघाभर पाणी साचले. दरम्यान, नाल्याचे दुर्गंधीयुक्त पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. दरम्यान, नगरपालिकेने पावसाळ्यापुर्वी नालेसफाईचे काम हाती घ्यावे अन्यथा पालिकेसमोर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते अर्जुन पाडेवार यांनी दिला आहे.



मागील काही दिवसांपासून शहर परिसरात मान्सूनपूर्व पाऊस हजेरी लावत आहे. शनिवारी सायंकाळी जोरदार पाऊस कोसळला. त्यामुळे गाव पान २ वर

## शाळा बंद करणारा 'तो' संच मान्यतेचा निर्णय रद्द करा

### मराठवाडा शिक्षक संघाची मागणी

**दत्ता देशमुख**

**टेंभूर्णी** - १५ मार्च २०२४ चा संचमान्यतेचा शासनादेशामुळे शाळा बंद पडत असून त्यामुळे गोरगरीबांना शिक्षणाची दारे बंद होणार आहेत. सामान्य माणसाच्या शिक्षणाच्या नरडीला नख लावणारा अन्यायकारक शासनादेश रद्द करावा अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव व सरचिटणीस राजकुमार कदम यांनी राज्याचे मुख्यमंत्री व शालेय शिक्षण मंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.



मराठवाडा शिक्षक संघाचे जिल्हा सचिव संजय येळवंते यांनी याबाबत दिलेल्या प्रसिध्दीपत्रकात म्हटले आहे की, राज्याच्या शालेय शिक्षण व क्रिडा विभागाने खाजगी अनुदानित शाळेतील संचमान्यतेसाठी १५ मार्च २०२४ रोजी शासनादेश निर्गमित केला आहे. या शासनादेशान्वये संचमान्यता केल्यामुळे अनेक शाळेतील शिक्षकांची पदे कमी झाली आहेत, अनेक शाळेत शून्य पदे झाल्याने अशा शाळा बंद पडणार आहेत परिणामी या शाळेतील विद्यार्थ्यांचे शिक्षण धोक्यात येणार आहे.

सार्वजनिक शिक्षण व्यवस्थेच्या नरडीला नख लावणारा, गोरगरीबांना शिक्षणाची दारे बंद करणारा हा जाचक अन्यायकारक शासनादेश असल्याने तो रद्द करावा आणि २८ ऑगस्ट २०१५ च्या शासनादेशानुसार संच निर्धारण करण्यात यावा. अशी मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, मुंबई उच्च न्यायालयात याचिका क्र ५४५६/२०२५ मधील आदेशानुसार संचमान्यतेची 'जैसे थे' स्थिती ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. न्यायालयीन निर्णयाची त्वरित अंमलबजावणी करण्यात यावी. सदरील पान २ वर

## शाश्वत शहरविकासासाठी पर्यावरणपूरक दृष्टिकोन ठेवावा - प्रतिभा भदाणे

**जालना । प्रतिनिधी** - शहराच्या वाढीबरोबरच समस्यादेखील वाढतात. त्यामुळे शहर लहान असताना व्हिजन डॉक्युमेंट तयार करून त्यात पर्यावरण रक्षण, पाण्याचा पुनर्वापर, जल पुनर्भरण, हरित क्षेत्रांचे जतन, ओपन स्पेसमध्ये वृक्षारोपण आणि सौर उर्जे सारख्या पर्यायांचा विचार होणे अत्यंत आवश्यक आहे. जालनासारख्या शहरांसाठी ही संधी अधिक प्रभावीपणे साधता येऊ शकते, असे प्रतिपादन राज्याच्या नगरविकास संचालनालयाच्या संचालक प्रतिभा भदाणे यांनी केले.

जालना क्रेडाईच्या नूतन पदाधिकाऱ्यांच्या पदग्रहण सोहळ्यानिमित्त रविवारी (ता. १८ मे) हॉटेल गॅलेक्सी येथे आयोजित शहरांचा शाश्वत विकास या विषयावरील विशेष व्याख्यानात त्या बोलत होत्या. यावेळी महाराष्ट्र क्रेडाईचे उपाध्यक्ष सुनील कोतवाल आणि सहसचिव गंगाप्रसाद तोष्णीवाल प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

भदाणे म्हणाल्या की, सन १९९० मध्ये माझी पहिली पोस्टिंग जालना येथे झाली होती. त्या वेळीचे शहर आणि आजचे शहर यात मोठा फरक दिसतो. जालना सोन्याचा पाळणा' ही केवळ ओळख न राहता, पर्यावरणपूरक दृष्टिकोन ठेवून ती जपली गेली पाहिजे. शासनाने विविध धोरणांतून शाश्वत शहरविकासाला चालना दिली आहे. बांधकाम व्यावसायिक हे शहरी विकासाचे शिल्पकार असून त्यांनी पर्यावरणपूरक साहित्य, ऊर्जा कार्यक्षम डिझाइन्स, जलसंधारण आणि पर्यावरण संतुलन यावर भर दिल्यास शहरे अधिक सुंदर व राहणीय बनतील. शहराच्या शाश्वत विकासासाठी प्रशासनाचे सर्वतोपरी सहकार्य राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

सुनील कोतवाल यांनी शहर विकासासाठी प्रशासन, क्रेडाई व विविध संस्थांनी परस्पर सहकार्याने काम करण्याची गरज व्यक्त केली. त्यांनी जालना क्रेडाईतील अभयकुमार आबड, संजय मुथा, विजयकुमार बगडिया यांच्या योगदानाचा उल्लेख केला. गंगाप्रसाद तोष्णीवाल यांनी क्रेडाईची नवीन कार्यकारिणी चांगले कार्य करेल, असा पान २ वर



## संपादकीय

# ...तर मधमाशी दिनाचे सार्थक

आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक मधमाशी दिन म्हणून साजरा केला जातो. अँतोन जोंसा या जगप्रसिद्ध मधुमक्षिका पालन तज्ज्ञाचा २० मे १७३४ रोजी स्लोव्हनिया या देशातील गरीब कुटुंबात जन्म झाला. त्यांनी १७६६ मध्ये युरोपात पहीले मधमाशी पालन केंद्र सुरू केले. १७७१ मध्ये त्यांनी मधुमशीपालनावरील पहिले पुस्तक प्रकाशित केले होते. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन संयुक्त राष्ट्रसंघाने २० मे २०१८ पासून २० मे हा दिवस जागतिक मधमाशी दिन म्हणून घोषित केला. या दिवशी मधमाशांचे संवर्धन करण्यासह कीटकांचे संवर्धन करण्यासाठी जनजागृती केली जाते. मधमाशी हा पर्यावरणातील अतिशय महत्वाचा घटक आहे. मधमाशी हे जीवसृष्टीला मिळालेले सर्वोत्तम वरदान आहे. मधमाशीला सामाजिक कीटक असे म्हटले जाते. मधमाशा इतर किटकांप्रमाणे एकट्या दुकट्या राहत नाही तर त्या समूह करून राहतात. त्यांच्या घराला पोळे असे म्हणतात. एका पोळ्यात हजारो मधमाशा असतात. मधमाशा त्यांच्या अन्नाच्या पूर्ततेसाठी फुलातील मकरंद आणि पराग गोळा करतात. मधमाशा एका फुलावरून दुसऱ्या फुलावर परागकणांचे स्थलांतर करतात त्यामुळे फुलांची बीजधारणा व फलधारणा होते त्यालाच परागीभवन असे म्हणतात. परागीभवनामुळे पीक उत्पादनात २५ ते ३० टक्के वाढ होते हे शास्त्रज्ञांनी सिद्ध करून दाखवले आहे त्यामुळे मधमाशा या शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहेत. तरीही मधमाशीपालनाबाबत आपल्याकडील शेतकरी अजूनही गंभीर नाहीत उलट मधमाशांचे पोळे जाळून त्यांना शेतातून हाकलून देण्याकडेच शेतकऱ्यांचा कल असतो. पूर्वी शेतात, बांधावर, आजूबाजूला सहज नजरेस पडणारी मधमाशांची पोळे आता दिसत नाही. मधासाठी पोळे जाळणे, कीटकनाशके फवारणे, मोबाईल टॉवर उभारणे, मधमशांविषयी अज्ञान पसरवणे या कारणांमुळे मधमाशी सारखा उपयुक्त जीव नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. परिसरातील मधमशा नष्ट झाल्या तर त्याचा पीक उत्पादनावर विपरीत परिणाम होऊ शकतो म्हणून आपण सर्वांनी मधमाशांच्या संरक्षणासाठी व संवर्धनासाठी पुढे आले पाहिजे. मधमाशांची शास्त्रिय माहिती घेऊन तिचे संगोपन करण्याचे तंत्र अवगत केले पाहिजे. पराग सिंचनामुळे शेती उत्पादनात वाढ होत असल्याने मध व मेन या बाबीपेक्षा उत्पादनातील वाढ हा महत्वाचा घटक मानून शेतकऱ्यांनी मधमाशी पालनाला अग्रक्रम द्यायला हवा. सरकारनेही याबाबत शेतकऱ्यांचे प्रबोधन करायला हवे. रोजगार निर्मितीला वाव असल्याने मधमाशी पालन हा पूरक उद्योग म्हणून केल्यास ग्रामीण भागातील बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो. मधमाशी ही आपल्यासाठी अतिशय महत्वाचे काम करते. मधमाशांकडून शिकण्यासारखेही खूप आहे. समूहात राहून आदर्श जीवन कसे जगावे हे मधमाशांकडून शिकावे. दीर्घ कष्ट केल्याने मधासारखा गोड पदार्थ निर्माण करता येतो हे मधमाशांनी दाखवून दिले आहे. मधमाशी हा केवळ मानवासाठीच नव्हे तर संपूर्ण जीवसृष्टीसाठी अतिशय महत्वाचा घटक आहे. आपण सर्वांनी मधमाशी वाचवण्याचा पर्यायाने जीवसृष्टी वाचवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला तरच मधमाशी दिनाचे सार्थक झाले असे म्हणावे लागेल.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# वारकरी जीवनमूल्य विचारधारा जोपासणारा ' वारी' विशेषांक -हभप ज्ञानेश्वर महाराज बंडगर



**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** महाराष्ट्र ही खऱ्या अर्थाने वारकरी संप्रदाय जीवनमूल्य जोपासणारी विचारभूमी आहे. अशा भूमीत कष्टकरी,शेतकरी, श्रमिकाचा देव असलेला पंढरपूरचा पांडुरंग आणि वारी आहे.हभप गुरुवर्य सोनुने गुरुजी यांच्या कृतज्ञतेसाठी निघालेला ' वारी ' हा विशेषांक वारकरी जीवनमूल्य जोपासणारा असल्याचे हभप ज्ञानेश्वर महाराज बंडगर यांनी सांगितले.

श्री.गौरीशंकर सेवा आश्रम गोंधनखेडा येथे आयोजित हभप गुरुवर्य सोनुने गुरुजी अमृत महोत्सव वर्षानिमित्त ' अमृत जीवनाचा अमृत महोत्सव ' अखंड हरिनाम सप्ताह आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात सुयश प्रकाशन जालनाने ' वारी ' विशेषांकाचे प्रकाशन समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात

खासदार डॉ. कल्याण काळे,माजी केंद्रीय रेल्वेराज्यमंत्री रावसाहेब दानवे पाटील,हभप ज्ञानेश्वर महाराज बंडगर,

हभप अनिरुद्ध महाराज क्षीरसागर, परमपूज्य महेशगिरी बाबा, हभप प्रकाश महाराज जवंजाळ, हभप गंजीधर महाराज, प्राचार्य डॉ. गणेशअग्निहोत्री,

जिल्हा परिषद सदस्य शालिकराम म्हस्के, नगराध्यक्षा सुरेखा लहाने, संपादक डॉ. सुहास सदाव्रते,डॉ.यशवंत सोनुने, डॉ.कैलास इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

' वारी' विशेषांकाचे प्रकाशन हभप ज्ञानेश्वर महाराज बंडगर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. प्रकाशन समारंभात बोलताना हभप ज्ञानेश्वर महाराज बंडगर म्हणाले,की

महाराष्ट्र ही वारकऱ्यांची भूमी आहे. वारी ही बाराही महिने चालते, तेव्हा हरिनामाचा जागर चालतो. वारी ही जीवनाचे नी जगण्याचे तत्वज्ञान सांगते. वारी ही श्रमिकाची परंपरा सांगते, दुजाभाव न करता अठरापगड जातीतील सारेच एकतेची पताका घेत चालतात ,हीच वारकरी संप्रदायाची विचारधारा असल्याचे हभप बंडगर महाराज यांनी सांगितले.

'पंढरीची वारी, रामकृष्ण हरी,गाथा ज्ञानेश्वरी ..'

हीच विचारधारा वारकरी संप्रदायाची जीवनमूल्य,मूल्यसंस्कार रुजविणारी आहे,

जगात एकमेव धर्म ग्रंथ म्हणजे ज्ञानेश्वरी आहे..वारकरी संप्रदायाचा विचार सोपा आणि सुखाचा असल्याचे हभप बंडगर महाराज यांनी सांगितले.

प्रकाशन समारंभात बोलताना माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे पाटील म्हणाले,की हभप गुरुवर्य सोनुने गुरुजींनी चालविलेला वारकरी धर्मसंकीर्तन विचारधारा प्रवाह अविरत वसा वारसा पुढेही अधिक जोमाने चालत राहो,यासाठी सदिच्छा असल्याचे माजी खासदार दानवे यांनी सांगितले. खासदार डॉ.कल्याण काळे म्हणाले,की शिस्तप्रिय असलेले गुरुजन आणि त्यांचा अमृतमहोत्सव सोहळा साजरा होतो,हीच आनंद अनुभवाची विचारधारा आहे. वारकरी संप्रदायाचा आचारविचार हा मानवी जीवन व्यापून टाकणारा आहे. संप्रदायाच्या व्यासपीठावर राजकारणावर बोलणे,संयुक्तिक नसल्याचे सांगून समाजात वारकरी संप्रदायाचा विचार पोहोचविणे काळाची गरज असल्याचे खासदार काळे यांनी सांगितले.

प्रकाशन समारंभात ज्येष्ठ पत्रकार तथा ' वारी' विशेषांकासाठी सहायक करणारे प्रल्हाद धोडपकर, अभिनेते विनोद जैतमहाल , काव्या क्रिएशनचे विशाल कुलकर्णी ,डॉ.कैलास इंगळे, डॉ.सुहास सदाव्रते यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात भगवान महाराज गायकवाड यांनी ' अमृत जीवनाचा अमृत महोत्सव आयोजन करण्यामागील शिष्य परिवाराचे प्रयत्न कसे यावर अनुभव व्यक्त केले.

प्रकाशन समारंभात ' वारी ' विशेषांक संपादनाची भूमिका सुयश प्रकाशनचे संपादक डॉ.सुहास सदाव्रते म्हणाले,की महाराष्ट्रातील वारी आणि वारकरी संप्रदायाची जीवनमूल्य कशी यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न आहे. वारी विशेषांकात कीर्तनकार, प्रवचनकार प्रबोधनकार यांचे विविध विषयांवरील लेख असून वर्तमानात वारकरी संप्रदाय जीवनमूल्य विचार अपरिहार्य ठरतो,हीच भूमिका ' वारी' विशेषांकाची असल्याचे संपादक डॉ.सदाव्रते यांनी सांगितले. प्रकाशन सोहळ्याचे सूत्रसंचालन डॉ.समाधान इंगळे यांनी केले.संपादक डॉ.कैलास इंगळे यांनी आभार मानले.

# सीएनआयच्या अधिवेशनात नविन कार्यकारणी घोषित

**जालना । प्रतिनिधी -** मराठवाडा डयोसेसन कौन्सिल ( सी. एन. आय. ) च्या ९ व्या अधिवेशनामध्ये नवीन कार्यकारणी निवडण्यात आली आहे अध्यक्षपदी मा. रा. रेव्ह. पी. डी. पाटोळे बिशप, उपाध्यक्ष मा. रेव्ह .एस. एस. खंडागळे, सचिव मा. जेम्स अंबिलढगे , कोषाध्यक्ष मा. डॅनियल अस्वले तर कार्यकारणी सदस्य म्हणून मा. रेव्ह.एस. वाय. घुले , मा. रेव्ह. एस



.एस. बत्तीसे , मा. रेव्ह . प्रभाकर भालेराव , मा. डॉ. लालबहादूर कांबळे, मा. एस एस घुले , मा. वैभव उगले यांची कार्यकारणी सदस्य म्हणून फेर निवड करण्यात आली असून मा. सौ. निर्मला गुडेकर, मा. सौ. अर्चना आर. राठोड ,ज्ञमा. सौ. बबीता घुले, मा. कु. हर्ष निर्मळ आदींची निवड करण्यात आली आहे.

# निवृत्तीवेतनधारकांनी ऑनलाईन फॉर्म भरण्याच्या संदेशास बळी पडू नये

**जालना । प्रतिनिधी -** निवृत्तीवेतन सुरु करणे, निवृत्तीवेतन बंद करणे, निवृत्तीवेतन फरक अदा करणे अथवा अतिरिक्त रक्कम वसूल करण्याच्या अनुषंगाने राज्यातील कोषागार कार्यालयामार्फत फोनद्वारे/ मोबाईलद्वारे निवृत्ती वेतनधारकांना कळविले जात नाही. तसेच व्हॉट्पद्वारे अथवा इतर सोशल मिडियावरुन निवृत्तीवेतन बंद होऊ नये, याकरिता लिंक ओपन करुन फॉर्म भरण्याबाबतही कळविले जात नाही.

तसेच कोषागार कार्यालयामार्फत कोणत्याही कर्मचाऱ्यास निवृत्तीवेतनधारकाच्या घरी पाठविले जात नाही. कोषागारमार्फत करण्यात येणाऱ्या सर्व व्यवहारांकरीता पत्रव्यवहार केल्या जातो. सर्व निवृत्तीवेतनधारकांना आवाहन करण्यात येत आहे की, त्यांनी फोन पे/गुगल पे/ ऑनलाईन रक्कम भरण्याचा अथवा ऑनलाईन फॉर्म भरण्याच्या संदेशास बळी पडू नये. अशा प्रकारे दुरध्वनीद्वारे /मोबाईलद्वारे संदेश प्राप्त झाल्यास जिल्हा कोषागार कार्यालयाशी तातडीने संपर्क साधाण्याचे आवाहन कोषागार अधिकारी यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

पान १ वरुन

## नागरिकांच्या घरात ...

भागातील छोटे पंजेतन तसेच कायमखानी गल्लीतील नाला तुंबला.रस्त्यावर गुडघाभर पाणी साचले.नाल्यातील घाण पाणी नागरिकांच्या घरात शिरले.त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

जोरदार पावसामुळे छोटे पंजेतन, कायमखानी गल्लीत रस्त्याना नाल्याचे स्वरूप आले. पावसाळ्यापूर्वीच नगरपालिकेने नाल्यातील गाळ व काडीकचरा काढण्याचे काम हाती घ्यायला हवे होते. परंतु तसे झाले नाही. या भागात जाऊन स्वतः पाहणी केली असता रस्त्यावर गुडघाभर पाणी साचल्याचे दिसून आले. तसेच शेपटाच्या अळ्यासह दुर्गंधीयुक्त पाणी थेट नागरिकांचे घरात शिरले. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. नालेसफाईचे काम करणे टाळून नगरपालिका अक्षरशः नागरिकांचे जीवाशी खेळत आहे. येत्या आठ दिवसात या भागात नालेसफाईच्या कामाला सुरुवात झाली नाही तर नगरपालिका कार्यालयासमोर जनतेच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे

## शाळा बंद ...

शासनादेशाप्रमाणे शिक्षकांना अतिरिक्त ठरवण्यात येवू नये. सार्वजनिक शिक्षण व्यवस्थेला हानिकारक १५ मार्च २०२४ च्या संचमान्यतेच्या अन्यायकारक शासन आदेशामुळे राज्यातील शिक्षण क्षेत्रात प्रचंड असंतोष निर्माण झालेला आहे. त्याची दखल घेऊन तो अन्यायकारक शासन आदेश रद्द करण्यात यावा अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव,सरचिटणीस राजकुमार कदम,कोषाध्यक्ष औताडे ए.बी., उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे,केंद्रीय कार्यकारणी सदस्य प्रेमदास राठोड, आरेफ कुरेशी, जिल्हाध्यक्ष रमेश आंधळे, मार्गदर्शक डॉ मारुती तेगमपुरे, डॉ पुरुषोत्तम जुन्रे, कोषाध्यक्ष नारायण मुंडे, उपाध्यक्ष भीमाशंकर शिंदे, जगन वाघमोडे, सहसचिव गणेश चव्हाण,प्रद्युम्न काकड,दीपक शेरे, महिला शहराध्यक्ष ज्योती पांगारकर युवा शहराध्यक्ष सोहम बोदवडे, प्रसिद्धी प्रमुख, भगवान धनगे, हकीम पटेल, सदस्य तुकाराम पडघन यांनी केले आहे.

## शाश्वत शहर ...

विश्वास व्यक्त करून, महाराष्ट्र कार्यकारिणीचे मार्गदर्शन कायम राहील असे सांगितले. मावळते अध्यक्ष अभय कुलकर्णी यांनी आपल्या कार्यकाळातील उपक्रमांचा आढावा सादर केला. नूतन अध्यक्ष डॉ. विठ्ठल पवार यांनी मनोगतात सांगितले की, क्रेडाई ही फक्त बांधकाम व्यावसायिकांची संघटना नसून, हजारो लोकांना रोजगार देणारे एक मोठे छत्र आहे. या व्यवसायावर सुमारे २०० घटक अवलंबून आहेत. काळानुसार आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत व्यवसायिकांनी स्वतःला अपग्रेड करणे गरजेचे आहे.

कार्यक्रमाच्या प्रारंभी पदग्रहण सोहळ्यातील डॉ. विठ्ठल पवार यांनी अध्यक्षपदाची सूत्रे मावळते अध्यक्ष अभय कुलकर्णी यांच्याकडून स्वीकारली. तसेच नूतन सचिव चेतन मराठे यांनी मावळते सचिव अविनाश भोसले यांच्याकडून पदभार स्वीकारला. यावेळी उभयतांसह सिद्धांत शर्मा, रितेश मंत्री, विष्णू पाटेकर, रवींद्र हुसे, दीपक आंभोरे, शरद बारगजे, केदार जाधव, शेखर जयस्वाल, वैभव बंब, अंशुल आबड यांच्यासह नूतन पदाधिकाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पूजा करवा यांनी केले तर आभार प्रदर्शन रवींद्र हुशे यांनी केले. या कार्यक्रमाला शहरातील अनेक विकासप्रिय नागरिक, उद्योगपती, बांधकाम व्यावसायिक, व्यापारी, सीए, डॉक्टर्स, वकील आणि सामाजिक संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राजकीय नरकाच्या स्वर्गाचा साक्षीदार

शिवसेना नेते, खासदार,जेष्ठ प्रवक्ते, सतत प्रसारमाध्यमांवर आपल्या राजकीय विषयावर रोखठोक मतांचे प्रदर्शन करणारे संजय राऊत साहेब ह्यांचे नरकातला स्वर्ग ह्या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळा दिग्गजांच्या उपस्थितीत पार पडला. काय आहे ह्या पुस्तकात ? तुरुंगातले अनुभव हे चांगले असूच शकत नाही.त्यात विशेष काय आहे ? वाचून काय मिळणार ?,कशासाठी वाचायचं ?, कोणासाठी वाचायचं ?,त्याचं फलित काय,हे प्रश्न नक्कीच उपस्थित होतात. ह्या सर्व प्रश्नाचे विचारपूर्वक निरीक्षण केले असता असे लक्षात येते.कि, कट्टर हिंदुत्ववादी देशभक्त,विचारांच्या उंचीला वेसण नसलेले हिंदुहृदय सम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे ह्यांच्या तालमीत तयार झालेले संजय राऊत हे तारुण्यातच सामनाचे संपादक झाले.कुशाग्र बुद्धिमत्ता,पृथ्वीला प्रदक्षिणा घालून सत्य काय ह्याचे वृत्तांकन करतात.आपण कोणाकोणाला राजकीय शत्रू करतो आहोत ह्याची जाणीव असूनसुद्धा कोणत्याही राजकीय नेत्याची हुजरेगिरी केली नाही हि अमूल्य जमेची बाजू म्हणता येईल.कारण असे म्हटले जाते

**लाख तलवारे बढते चली**
**आती है गर्दन कि तरफ !**
**सर झुकाने आता नही**
**तो झुकाए कैसे ? !!**

सत्य नीतिमत्ताची कास सोडू नका,खचू नका आत्मविश्वास गमावू नका असा आत्मविश्वास वाढवणारे बाळासाहेबांच्या तालमीत तयार झालेले संजय राऊत ह्यांच्याकडे सामनाचे संपादक हि जबाबदारी फक्त शाब्दिक शस्त्रअस्त्र वापरण्या बरोबर पक्षाला देशाच्या राजकीय पटलावर सतत उंचीवर नेण्याचे शिवधनुष्य खांद्यावर विश्वासाने दिले.भाजपने केलेल्या विश्वासघाताचा बदला संजय राऊत यांनीच घेतला. कोणी काही म्हणो पण महाविकास आघाडी सत्तेवर आणण्यात संजय राऊत यांचा सिंहाचा वाटा आहे.महाविकास आघाडीच्या कोणत्याही नेत्यावर भाजपने राजकीय हल्ला केला तर त्या नेत्याच्या हल्ल्याची वाट न पाहता प्रथम संजय राऊतच त्याला सडेतोड उत्तर देत होते. कारण हे आपल्याच कुटुंबातील नेते आहेत हे समजून आपलेपणाने बाजू मांडायचे परंतु त्याची साधी जाणीव त्या नेत्यांनी न ठेवता उलट राऊत याना टोमणे मारायचे ह्यावरून ते नेते किती हलक्या मनोवृत्तीचे आहेत आणि संजय राऊत हे मनाने किती मोठे आहेत हे दिसून येते.देशाची खबर ठेवणाऱ्या संजय राऊत ह्यांच्याकडून काही खरमरीत बातमी मिळते म्हणून टीव्ही चॅनेलचे प्रतिनिधी नऊ वाजले कि त्यांना भेटायला उत्सुक असतात. त्यांचा टीआरपी वाढतो हीच गोष्ट राजकीय नेत्यांना खटकते,कारण त्या नेत्यांना वार्ताहर हिंग लावून सुद्धा विचारत नाही, म्हणून सकाळ झाली कि भोंगा वाजतो असे शब्द प्रयोग करून आपल्या जळकट मनोवृत्तीचे दर्शन करत आहेत.ह्या सर्व प्रकारामुळे संजय राऊत हे काही न बोलता



आपले विचार प्रसारमाध्यमांना देताना शेर चले अपनी चाल,और कुत्ते भौके हजार असे दृश्य रोज पाहायला मिळते.नागरिकांना देशाचा मूड काय आहे हेही समजते.विरोधी पक्षासहित नागरिकानाही आता सवय झाली. आहे.

राजकीय हेतूने विरोधकांच्या मुसक्या आवळताना सत्तेचा दुरुपयोग करून अनेक जणांना ईडी चा प्रसाद मिळाला.जे झुकले ते सुटले,राऊत झुकले नाहीत म्हणून सुटले नाहीत. महाराष्ट्र हा गांडूचा नाही तर मर्दाचा महाराष्ट्र आहे हे देशात सिद्ध झाले.सत्तेचा दुरुपयोग करून हुकूमशाहीकडे वाटचाल करणाऱ्या नेत्यांची मानसिकता उघडी पाडत त्याला जाहीर आव्हान करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. त्याची मुहूर्तमेढ राऊत यांनी रोवली आहे.अटक होणार ह्याचा दूरदृष्टीकोन ठेवून अगोदरच आपले संपादकीय शस्त्र परजून ठेवले.ईडीच्या कारवाईला सामोरे जाताना मर्दानगी काय असते हे देशाला दाखवून जेलमध्ये गेले.१०० दिवसाचा मानसिक क्लेशाचा कारावास झाला त्याचा फायदा स्वतः राऊत याना आणि शिवसेना पक्षाला झाला.जेलमध्ये गेल्याने राऊत यांना आपल्या विचारांचे,कृतीचे योग्य ते सिंहावलोकन करता आले.अटक झाली हे फार चांगले झाले.जेलमध्ये जाण्यापूर्वीची भाषा आणि जेलमधून सुटून आल्यानंतरची भाषा,राजकीय ऍटम बॉम्ब ह्याला कमालीची धार आली.राऊत ह्यांनी ईडीचे आभार मानायला पाहिजे.ईडीने आपले कर्तव्य बजावताना कोणत्याही राजकीय नेत्याच्या ताटाखालचे मांजर होऊ नये.राऊत ह्यांनी त्या सर्व अधिकाऱ्यांना निलंबित करण्याची मागणी करायला पाहिजे होती.व ज्या नेत्याने आदेश दिला त्याच्यावरही काही कोटींचा अब्रुनुकसानीचा दावा ठोकायला पाहिजे होता.त्याशिवाय त्यांची खोड मेली नसती.नरकातला स्वर्ग पुस्तक लिहून जनजागृती केली त्याबद्दल देशाची जनता त्यांचे मनोमन आभार नक्कीच मानत असतील यात शंका नाही.



**यशवंत चव्हाण सीबीडी, बेलापूर (नवी मुंबई)**
**मो.९९२०७७६२७७**

# कॉमरेड प्रकाश बोदवडे यांना अंतिम लाल सलाम

## मराठवाड्यातील विविध संघटनांकडून क्रांतिकारी श्रद्धांजली

**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** श्रमिक चळवळींचा बुलंद आवाज आणि कामगारांच्या हक्कासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित करणारे ज्येष्ठ समाजसेवक कॉमरेड प्रकाश बोदवडे यांचे शनिवारी सकाळी दीर्घ आजाराने निधन झाले. गेल्या अनेक दशकांपासून ते शेतकरी, कामगार आणि वंचित घटकांच्या न्याय हक्कांसाठी संघर्ष करत होते. त्यांच्यावर शनिवारी दुपारी रामतीर्थ स्मशानभूमी, जालना येथे क्रांतिकारी परंपरेनुसार लाल सलाम देत अंत्यसंस्कार करण्यात आले.

मराठवाड्यातून मोठ्या प्रमाणावर उपस्थिती:

या वेळी मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांमधून आलेल्या सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, ट्रेड युनियन प्रतिनिधी, विद्यार्थी संघटना आणि मानवाधिकार कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या श्रद्धांजली सभेस कॉमरेड भवते, कॉमरेड भीमराव बनसोडे, कॉमरेड मारुती तेगमपुरे, कॉमरेड बाबूराव कावळे, कॉमरेड भगवान भोजने, कॉमरेड वैजिनाथ लोंढे, कॉमरेड अशोक साबले, कॉमरेड शेलके (एनआरबी), कॉमरेड प्रल्हाद पडूळ, कॉमरेड मधुकर मोकळे, कॉमरेड ज्ञानोबा वरवटे, कॉमरेड सोनवने, कॉमरेड सोहब बोदवडे, कॉमरेड



बुद्धिनाथ बराळ, ड. अनिल मिसाळ, कॉ. बाबासाहेब पाटोळे, कॉ. अनिल गायकवाड, जगन वाघमोडे, प्रेमदास राठोड, आरिफ कुरैशी, नारायण मुंढे, गणेश मेहत्रे, इमरान सिद्दीकी, मयुर राऊत, भगवान अंभोरे, मनोज बसैय्ये, अमन गिरी अमोल टाकलकर आदींनी उपस्थित राहून कॉमरेड प्रकाश बोदवडे यांना क्रांतिकारी लाल सलाम अर्पण केला.

धर्माच्या पलीकडे क्रांतीचा मार्ग:

कॉमरेड बोदवडे यांची अंतिम इच्छा होती की, त्यांच्या अंत्यसंस्कारात कोणतेही धार्मिक विधी न करता क्रांतिकारी लाल परंपरेनुसार निरोप द्यावा. लाल झेंडे आणि इन्कलाबी घोषणांच्या पार्श्वभूमीवर जेव्हा त्यांना अखेरचा निरोप देण्यात आला. त्यांच्या विचारांना पुढे नेण्याचा निर्धार प्रत्येकाच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता.

भावनिक श्रद्धांजली:

यावेळी उपस्थित अनेक कॉमरेड्सनी त्यांच्या कार्याला उजाळा देत भावनिक श्रद्धांजली अर्पण केली.

कॉमरेड बोदवडे यांनी कामगारांचा आवाज संसदपर्यंत पोहोचवला.

त्यांनी सामाजिक न्यायासाठी प्रत्येक आघाड्यावर संघर्ष केला. ते फक्त व्यक्ती नव्हते, तर एक प्रेरणादायी विचारधारा होते, जी पुढच्या पिढ्यांना दिशा देत राहील.

**संकल्प:**

सभेच्या शेवटी सर्वांनी एकत्रितपणे संकल्प केला की कॉमरेड प्रकाश बोदवडे यांचे अपूर्ण कार्य पूर्ण करणे हीच खरी श्रद्धांजली असेल. त्यांचा संघर्ष, विचारधारा आणि बांधिलकी आपल्याला कायम प्रेरणा देत राहील.

# जिल्ह्यात यलो अलर्ट; सोसाट्याचा वारा

## पावसाची शक्यता; दक्षता घेण्याचे प्रशासनाचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, कुलाबा, मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार जालना जिल्हयात दि. १९ मे व २२ मे २०२५ रोजी यलो (धशश्रश्रे) अलर्ट जारी केला असुन तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह वादळ, सोसाट्याचा वारा (ताशी ४०-५० कि.मी.प्र.ता. वेगाने) हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तवली आहे. तसेच २३ मे २०२५ रोजी ढगांच्या गडगडाटासह हलका पाउस पडण्याची शक्यता वर्तविली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनातर्फे जिल्ह्यातील नागरीकांना खालीलप्रमाणे दक्षता घेणेबाबत आवाहन करण्यात येत आहे.

मेघगर्जनेच्या वेळी, वीजा चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये. वीजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा, धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये. गडगडाटीच्या वादळादरम्यान व वीजा चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. वीजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा, ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल / सायकल यांचेपासून दूर रहावे,मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत/ दिव्यांचे खांब, धातुचे कुंपण, विदयुतवाहिनी अथवा ट्रॉन्सफोर्मजवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अर्थातरी लटकणा-या / लोंबणा-या तारांपासून दूर रहावे.वीजा चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे, जमीनीशी कमीतकमी संपर्क असावा.अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकरी बांधवांनी वेळीच नियोजन करावे. शेतक-यांनी शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीमध्ये शेतमाल विक्रीसाठी आणला असेल किंवा त्याप्रमाणे नियोजन केले असेल, तर सदर मालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी,जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे.

सर्व नागरीकांनी वादळी वारे, वीज पासून स्वतः सह जनावरांचे संरक्षण होईल याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी, आपत्कालीन परिस्थितीत जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना ०२४८२-२२३१३२ वर तसेच नजीकचे तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन यांचेशी संपर्क साधाण्याचे आवाहजन निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण गणेश महाडिक यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# कै.बाबुराव जाफ्राबादकर विद्यालयाचा शालांत निकाल ९३.६७%

**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** कै.बाबुराव जाफ्राबादकर माध्यमिक विद्यालयाचा २०२४ २५ शालांत परीक्षा निकाल ९३.६७% लागला आहे. विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवले आहे.

विद्यालयातून प्रथम क्रमांक चोपडे विशाल ९३.४०% , द्वितीय दिवांशू पासवान ८७.४०% , तृतीय नयना गवई ८४.६०% क्रमांक यांनी पटकावले.

विशेष प्राविण्य ताठे निकिता ८४.२०%,जाधव अमन ८३.४०%,नवले साक्षी ८२.२०%, राय अविनाश ८०.८०%,ढवळे तेजस्विनी ८०%,नागरे प्रतीक ७९.६०%, घुले मनस्वी ७८.४०%,ठाणगे अमृता ७८.४०%,बोचरे वैष्णवी ७७%,गोगडे भक्ती ७६.६०%,काझि यासीर ७६.६०%,उबाळे भक्ती ७६.६०%,शेवाळे अश्विनी ७५.४० %,लहाने गायत्री ७५.२०% यादव आदित्य ७५ .00% प्रथम श्रेणी : २२ द्वितीय श्रेणी: १८ तृतीय श्रेणी : १५ यशस्वी विद्यार्थ्यांचे हिंदू समाज संस्थेचे अध्यक्ष ड.संजीव देशपांडे,उपाध्यक्ष ड.जगदीश बडवे, सचिव चंद्रशेखर वाघमारे , संचालक कुमारजी देशपांडे, नितीन कोळेश्वर, जुगल किशोर भक्कड शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती. कुलकर्णी एम .एस. शाळेचे शिक्षक संदीप इंगोले, मदन सोजे, भीमाशंकर कुलकर्णी, राजाराम साबळे,सागर वाघमारे, शशिकांत कुलकर्णी, वरकड सर,कल्याणी देशमुख, गाडेकर अलकनंदा, भालेकर पि.टी, नन्नवरे वंदना तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून अभिनंदन केले.

# मुकुंद आवटी, अलकेश सोमानी, प्रदीप जयस्वाल, रमेश साळवे यांची राजर्षी शाहू मल्टीस्टेट सोसायटीमध्ये संचालकपदी निवड



**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** राजर्षी शाहू मल्टिस्टेट को. ऑप क्रेडिट सोसायटी लि बुलढाणा, शाखा जाफ्राबाद येथील स्थानिक संचालक मंडळ म्हणून नुकतीच निवड करण्यात आली. राजर्षी शाहू पतसंस्थाचा विस्तार मोठा असून महाराष्ट्र सह मध्यप्रदेश मध्ये यांचे कार्यक्षेत्र असून या पतसंस्था मार्फत रक्तदान शेतकरी यांच्या हितांचे निर्णय साठी पाठपुरावा, सामाजिक उपक्रम या सह अनेक सामाजिक राजकीय उपक्रम या मार्फत राबविल्या जात असत. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री संदीप रामराव शेळके आणि या पतसंस्थाच्या अध्यक्षा सौ मालतीताई संदीप शेळके यांनी या संस्थेत विशेष लक्ष्य देऊन या संस्थेला अनेक मोठ मोठे आवार्ड भेटून दिले आहे.

या संस्थेत मध्ये टेंभुर्णी येथील श्री मुकुंद बाबुराव औटी श्री अलकेश नंदकिशोर सोमाणी श्री प्रदीप शिवलाल जैस्वाल,श्री रमेश प्रल्हादराव साळवे,श्री गुलाबराव नामदेव शिंदे, यांची निवड करण्यात आली असून या निवडी बद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत असून मानव सेवा कडून यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले. सोबत या पतसंस्था मध्ये सर्व श्री डॉ रमेश लक्ष्मण हरणे, भगवान रामेश्वर तांगडे,संतोष किसन उबाळे,डॉ. संजय जयदेवराव सावळे,डॉ. प्रवीण रामदास काळे, सुनील जगन्नाथ जाधव,सुरेश त्रिंबक जंजाळ,तेजराव अमृता भालके, अनंता हिम्मतराव बर्वे, राजाराम तुकाराम इंगळे, एड. विलास सखाराम बोर्डे, कुंडलिक हिम्मतराव मुठ्ठे,अमोल मधुकर पडघान,प्रमोद भास्कर फदाट. यांची ही या स्थानिक संचालक मंडळ पदी निवड झाली असून यांचे अभिनंदन होत आहे.

# सत्यशोधक विद्यालयाचे शालांत परिक्षेत यश अस्मिताने मिळवले ९७.00 टक्के

**भोकरदन । प्रतिनिधी -** मानव विकास व पूर्णनिर्माण संशोधन संस्था, औरंगाबाद संचलित सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गोषेगाव, तालुका भोकरदन जिल्हा जालना येथील विद्यालयाचा शालांत परीक्षेचा म्हणजेच १० वीचा निकाल जाहीर झाला असून निकाल १००% लागला.

यामध्ये प्रथम क्रमांक अस्मिता गजानन जैवळ ९७.00 %, द्वितीय क्रमांक वर्षा विजय लेकुरवाळे ९५.८० %, तृतीय क्रमांक श्रुतिका गजानन देखणे ९५.६० % , चतुर्थ क्रमांक ऋतुजा गणेश खरात ९५.२०% मिळवत विद्यालयातून विशेष प्राविण्य मिळवले आहे. श्रुतिका गजानन देखणे या विद्यार्थिनीने गणित या विषयात १०० पैकी १०० गुण मिळवले आहेत. त्याचबरोबर किर्तिमान संतोष मोहिते ९४.८०% ,गौरव जगन्नाथ घोडे ९४.६०%, वेदिका नंदकिशोर काथार ९४.४०% ,शिफा मुक्तार शेख ९३.८०%, प्रशांत विश्वनाथ गावंडे ९३.४०% , संजीवनी गजानन दौड ९३.२०%, श्रीखंडे श्रुति नामदेव , शितल सुभाष जैवळ, हर्षवर्धन भाऊसाहेब जैवळ, साक्षी ज्ञानेश्वर घोडे यांना ९३.00% , संशोध सूर्यकांत गंगावणे , अभिषेक धनाजी दाभाडे यांना ९२.८०% तर आरती अंकुश सोळुंके , अश्विनी उमेश मोहिते , ऋषिकेश अशोक मोहिते, राहुल भाऊसाहेब घोडे ९२.२०% विद्यार्थ्यांनी प्राविण्य मिळवत गेल्या २१ वर्षाची परंपरा याही वर्षी कायम ठेवली यासाठी संस्थेचे अध्यक्ष तथा प्राचार्य माननीय सुनीलजी वाकेकर साहेब ,संस्थेच्या सचिव जयश्रीताई बनकर मॅडम यांनी कौतुक केले, तसेच सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मार्गदर्शन लागले. सर्व उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांच्याकडून पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.




## महानगरपालिकेवर भगवा फडकविण्यासाठी सज्ज रहा - शेख वहिद

**जालना । प्रतिनिधी -** जालना आगामी जालना महानगरपालिकेच्या निवडणुकीत शहराचा चौफेर विकास करण्यासाठी आमदार अर्जुन खोतकर यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना ( शिंदे गटचा ) भगवा फडकविण्यासाठी शिवसैनिकांनी आतापासूनच कंबर कसावी असे आवाहन माजी नगरसेवक तथा धडाडीचे शिवसैनिक शेख . वहिद यांनीी केले आहे.



विधानसभेच्या निवडणुकीत जालनेकारांनी श्री. खोतकर यांना प्रचंड मतांनी विजयी करून जो विश्वास व्यक्त केला त्यावर श्री. खोतकर हे जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी तंतोतंत खरे उतरले आहे. अवघ्या काही महिन्यांमध्येच त्यांनी आपल्या विकास कामांची चुणूक दाखवून दिली आहे शहरातील पिण्याचा पाण्याचा प्रश्न पोट तिडकीने सोडविण्याचा प्रयत्न करत असताना अंबड येथील जलशुद्धीकरण केंद्र झपाट्याने पूर्ण करण्यासाठी त्यांनी आपले सर्वस्व पणाला लावले आहेत यामुळे जालनेकारांना पुरेशे पाणी मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे गेल्या अनेक वर्षापासून शहराला महिन्यातून तीन वेळेस पाणी पुरवठा होत असल्यामुळे जालनेकर आणि विशेष करून झोपडपट्टी भागात पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न निमर्णि झालेला आहे आ. श्री खोतकर यांनी इतर विकास कामापेक्षा पिण्याच्या पाण्याला प्राधान्य दिल्यामुळे त्यांनी जनते बद्दलची तळमळ दिसून येते. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न खऱ्या अर्थाने महानगरपालिका आ. श्री खोतकर यांच्या विकासाभिमुख आणि कर्तबगार नेत्यांच्या ताब्यात असने गरजेचे आहे असे शेख वहिद सांगितले आहे
.

शहरातील शिवसैनिकांनी आपापल्या प्रभागामध्ये नागरिकांच्या अडी अडचणी सोडून पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी आतापासूनच सज्ज राहावे आणि आ. श्री खोतकर यांच्या नेतृत्वाला अधिक बळ मिळेल यासाठी जागरूक राहणे गरजेचे असल्याचे श्री शेख वहीद यांनींनी सांगितले आहे

## पूनम सुलाने लिहिलेल्या ऋतुस्पर्श काव्यसंग्रहाला राज्यस्तरीय लक्षवेधी काव्यसंग्रह पुरस्कार

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** जाफ्राबाद तालुक्याची शान प्रसिद्ध कवयित्री सौ.पूनम सूलाने-सिंगल यांच्या ऋतुस्पर्श काव्यसंग्रहास राज्यस्तरीय लक्षवेधी काव्यसंग्रह पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

मराठी राजभाषा दिनाचे औचित्यसाधून साहित्यसंपदा आयोजित राज्यस्तरीय साहित्य संमेलन अलिबाग येथे नुकतेच पार पडले. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळालेला आहे.मराठी भाषेसाठी झटणाऱ्या आणि मराठी साहित्यक्षेत्रात बहुमूल्य योगदान देणाऱ्या काही निवडक संस्थांचा, लेखकांचा आणि पुस्तकांचा देखील सन्मान सदर साहित्य संमेलनात करण्यात आला.समाजात आशावाद पसरविणाऱ्या काव्य,कथा ,संकीर्ण,आत्मचरीत्रपर संग्रह अश्या विविध पुस्तकांना सन्मानित

करण्यात आले.त्या अंतर्गत

कै. सुरेखा मधुसूदन सपकाळ राज्यस्तरीय उत्कृष्ठ लक्षवेधी साहित्य निर्मिती पुरस्कार - २०२५ चा मान कवयित्री पुनम सुलाने यांच्या 'ऋतुस्पर्श या काव्यसंग्रहास बहाल करण्यात आला. संमेलनाध्यक्ष ज्येष्ठ गझलकार ए.के. शेख, उदघाटक आदर्श नागरी पतसंस्थाचे संस्थापक सुरेश पाटील, ज्येष्ठ पत्रकार नागेश कुलकर्णी,रायगड भूषण कवी व लेखक श्री रमेश धनावडे, ज्येष्ठ साहित्यिक एल.बी पाटील,साहित्यसंपदा संस्थापक वैभव धनावडे यांच्या प्रमुख उपस्थितीत अलीगड येथे हा कार्यक्रम अतिशय उत्साहात पार पडला सदर प्रसंगी संमेलनाचे स्वागताध्यक्ष किसन पेडणेकर यांनी पुरस्कार विजेत्या साहित्यिकांना शुभेच्छा दिल्या. कवयित्री पूनम सुलाने



या जि.जालना ता. जाफ्राबाद मधील गोकुळवाडी या छोट्याशा गावाच्या असून आतापर्यंत त्यांचे हिंदी व मराठी काव्यसंग्रह प्रकाशित झालेली असून साहित्य क्षेत्रातील अनेक पुरस्कार देखील त्यांना प्राप्त झालेली आहेत. त्या सध्या पंजाब राज्यातील जालंधर या शहरात वास्तव्याला आहेत. ऋतुस्पर्श हा त्यांचा पहिला मराठी काव्यसंग्रह असून महाराष्ट्रातील जवळजवळ प्रत्येक जिल्ह्यातील वाचकांचा या काव्यसंग्रहाला आतापर्यंत प्रचंड प्रतिसाद मिळाला असून,, राज्यस्तरीय लक्षवेधी काव्यसंग्रह पुरस्कार मिळाल्यानंतर कवयित्री पूनम सुलाने यांनी सर्व वाचकांना मनापासून धन्यवाद दिले तसेच पुरस्कारासाठी निवड केल्याबद्दल साहित्यसंपदा प्रकाशनाचे देखील कवयित्री पूनम सुलाने यांनी आभार व्यक्त केले असून हा पुरस्कार पुढील लेखनासाठी नक्कीच प्रेरणादायी ठरेल असे विचार कवयित्री पूनम सुलाने यांनी व्यक्त केले.

## कै. मारोतराव देशमुख विद्यालयात गुणवंतांचा सत्कार

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** कै. मारोतराव देशमुख माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शालांत प्रमाणपत्र परीक्षेमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला असून , शाळेने उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे.

विद्यालयाचा शालांत प्रमाणपत्र परीक्षा निकाल ८७.७५% लागला लागला असून विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. यामध्ये शाळेतून प्रथम क्रमांक रोहिणी धनवई ८४% द्वितीय क्रमांक साक्षी जोशी ८३.२%, तृतीय क्रमांकाने नंदनी धारे ८२% गुण घेऊन उत्तीर्ण झाल्या असून इतर विद्यार्थी देखील चांगले गुण घेऊन उत्तीर्ण झालेले आहेत.

संस्थेच्या तसेच विद्यालयाच्या वतीने उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा व पालकांचा सत्कार करण्यात आला असून संस्थेचे अध्यक्ष श्री.दिनकरराव देशमुख ,नारायणराव देशमुख, भगवानराव देशमुख, संदीप देशमुख,हौसेराव देशमुख, वींलरींश सुरेश देशमुख ,वसंतराव देशमुख, जगन्नाथराव देशमुख, मुकुंदराव देशमुख आदींनी विद्यार्थ्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. पुढील वाटचालीसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

शाळेचे मुख्याध्यापक समाधान दुनगहू,ज्येष्ठ शिक्षक बालू धनवई ,संतोष कोल्हे,संभाजी एडोले,मोहन मनेमाणिक,विजय काठोळे,एजाज बेग,गणेश आंधळे, विजय मघाडे,श्रीमती संगीता विधाते, माया पोटे,प्रल्हाद खारतुडे, सुधाकर वाघमोडे,पंजाबराव देशमुख, बालाजी जोशी,सुभाष जाधव इत्यादी शिक्षक व शिक्षकेतर शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.